<u>दिवाणी दावा क्रं.३३/२०२० नि.५८ खाली आदेश</u>

प्रतिवादीन क्रं. ३ ते १३ यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल करुन वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान दि. २६.०७.२०२० रोजी संभाषण झाल्याबाबतची सी.डी न्यायालयात सर्वांचे समोर पहाणे व ऐकणे आवश्यक आहे असे कथन केले आहे. त्यामुळे न्यायालयास वस्तुस्थिती व वादींची वर्तणुक समजणार आहे. तरी सदरचा अर्ज मंजूर करण्यास विनंती प्रतिवादी यांनी केली आहे.

०२. सदर अर्जास वादी यांनी म्हणणे देवून असे सादर केले आहे की, प्रतिवादी जी सी.डी. दाखल करु पहात आहेत त्यास माहिती व तंत्रज्ञान कायदयातील तरतुदींची बाधा येते. तसेच भारतीय पुरावा कायदा कलम ६५(ब) प्रमाणे ज्या व्यक्तीने सी.डी. तयार केली आहे त्याचे शपथपत्र व प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. सबब, प्रतिवादी यांचा अर्ज नामंजूर करावा अशी मागणी त्यांनी केली आहे.

०३. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादीनी दाखल केलेली सी.डी. ज्यामध्ये तथाकथीत संभाषणाचे व घटनेचे चित्रीकरण करण्यात आले आहे ते पाहण्याची विनंती केली असली तरी संभाषण व चित्रीकरणाच्या आधारे वादी किंवा प्रतिवादी यांचा संबंधीत दावा मिळकतीवर कब्जा ठरविणे संयुक्तीक ठरणार नाही.

त्यामुळे तुर्तातुर्त मनाई हुकुमाचा अर्ज निकाली काढताना प्रतिवादीने दिलेली सी.डी. पुरावा म्हणून पाहणे आवश्यक नाही. मनाई अर्जाचा गुणदोषावर निर्णय होण्यासाठी प्रतिवादी या व्यतिरिक्त परिणामकारक प्रथम दर्शनी पुरावा देवू शकतात. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज नामंजूर करण्यात आला आहे.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

Vinod Vilas Khulape

Digitally signed by Vinod Vilas Khulape
Date: 2020.12.22 16:46:20 +0530

दि. २२.१२.२०२०

( वि.वि.खुळपे )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
कळे खेरीवडे.